# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

## (प्रसिद्धीसाठी जाहीरात)

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचेकडे राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत **कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंताची पदे** भरण्यात येणार आहेत. खालील पदाकरीता इच्छुक उमेदवारांनी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे नांवे असलेला विहित नमुन्यात(जोडपत्र-1प्रमाणे) अर्ज **दि.३०/ ८ /2017 पर्यत सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत पोष्टाव्दारे किंवा हाती सादर करावा.** ई-मेल किंवा अन्य मार्गाने सादर केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

| अ. क्र. | पदनाम | एकुण पदसंख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| 1. | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |

<table>
<tr><td>2.</td><td>शैक्षणिक अर्हता</td><td>:</td><td>अ) मान्यता प्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवीका किंवा पदवी</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>ब) मराठी व इंग्रजी दोन्ही भाषा लिहिता व बोलता येणे आवश्यक</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>क) संगणकाचे ज्ञान आवश्यक (Computer literate with working Knowldge MS-Office)</td></tr>
<tr><td>3.</td><td>वयोमर्यादा</td><td>:</td><td>18 वर्षापेक्षा कमी व 33 वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी 5 वर्षानी शिथिलक्षम)</td></tr>
<tr><td>4.</td><td>मासिक मानधन व इतर भत्ते</td><td>:</td><td>
<table>
<tr><td>पदनाम</td><td>शैक्षणिक अर्हता</td><td>मानधन</td><td>इतर भत्ते</td></tr>
<tr><td rowspan="2">कनिष्ठ अभियंता (कंत्राटी)</td><td>स्थापत्य अभियांत्रिकी पदविका धारक</td><td>रु.20,000/-</td><td>1)इंटरनेट व मोबाईल भत्ता-रु.1000/-<br>2)प्रवास व दैनंदिन भत्ता-नियमित कनिष्ठ अभियंत्यांना अनुज्ञेय असलेल्या दरांने</td></tr>
<tr><td>स्थापत्य अभियांत्रिकी पदवी धारक</td><td>रु.22,000/-</td><td>वरीलप्रमाणे</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>5.</td><td>पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या</td><td>:</td><td>(अ)कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे अधिपत्याखाली काम करणे, (ब)ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची अंदाज पत्रके व आराखडे तयार करणे, (क)निविदा तयार करणे, योजनांच्या कामाचे संनियत्रण करणे, (ड)योजनांच्या प्रगतीचा आराखडा तयार करणे, त्याप्रमाणे कार्यवाही करणे व केलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांना सादर करणे, (ई)ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद व कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद यांच्याकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारी कामे करणे.</td></tr>
<tr><td>6.</td><td>अर्ज करण्याची पध्दत व सर्वसाधारण सुचना</td><td>:</td><td>उमेदवाराने अर्ज जाड फुलस्केप (A-4) कागदावर सोबतच्या जोडपत्र-1 मधील नमुन्यामध्ये सादर करावा, यामध्ये स्वत:चे संपुर्ण नाव (आडनाव प्रथम), जन्म दिनांक, वय , लिंग, पत्र व्यवहाराचा पत्ता (दुरध्वनी क्रमांक व मोबाईल क्रमांकासह) शैक्षणिक अर्हतेचा तपशिल, मागास वर्गीय असल्याबाबत प्रवर्ग अ.जा./अ.ज./वि.जा.-अ/ब/क/ड/ विमाप्र/ इमाव/खुला गट इत्यादीबाबतचा उल्लेख, शासकीय अनुभवाचा तपशिल इत्यादी माहितीसह अर्ज सादर करावा, अर्जाच्या वरील डाव्या बाजूस अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा, तो स्वसाक्षांकित करावा.</td></tr>
</table>